**पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिलक्र. ८५१९/२००६ या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार अनधिकृत प्रार्थना स्थळांचे बांधकाम पाडणे नियमित करण्यासंबंधाने निकष ठरविण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्रमांक :- सीटीएम ०९०९/प्र.क्र. ५५८/(भाग-२)/विशा-१ ब
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १४ मार्च २०११

**वाचा :-** १) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक :- सीटीएम ०९०९/प्र.क्र.५५८/भाग-२/विशा-१ ब, दि. २१.७.२०१०
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक - सीटीएम-०९०९/प्र.क्र. ५५८/भाग-२/विशा १ ब, दिनांक ३१.०७.२०१०
३) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक सीटीएम ०९०९/प्र.क्र.५५८/भाग-२/विशा-१ ब, दि. ४ ऑक्टोबर २०१०

RB-93

**शासन निर्णय :-** सार्वजनिक/शासकीय जागेवरील अनधिकृत प्रार्थना स्थळांची बांधकामे पाडून टाकणे/नियमित करणे यासंबंधात उपरोक्त नमूद प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २९.०९.२००९ व त्यानंतर दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने वर नमूद शासन निर्णय समक्रमांक, दिनांक ४.१०.२०१० नुसार धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. या संदर्भात अधिक सुस्पष्ट व सर्वंकष धोरण तयार करुन ते घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे अनधिकृत प्रार्थना स्थळे पाडून टाकणे/नियमित करणे यासंबंधी सुधारित धोरण शासन घोषित करेपर्यंत सर्व संबंधितांनी दिनांक ४.१०.२०१० च्या शासन निर्णयानुसारची कार्यवाही करण्याचे थांबवावे.

मात्र सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक पार्क किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी दि. २९.९.२००९ नंतर कोणत्याही स्वरुपाचे धार्मिक अनधिकृत बांधकाम मंदिर, मस्जिद, गुरुव्दारा किंवा चर्च इत्यादिच्या नावाखाली करावयाचे नाही किंवा होऊ द्यावयाचे नाही

25 MAR 2011

Regarding to G.R. Prathana Thikane.lwpC:\DOCUME~1\User\LOCALS~1\Temp\C.Lotus.Notes.Data

25/03/11

29 MAR 2011

असे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असल्याने त्याची अंमलबजावणी सुरु ठेवण्यात यावी.

२. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.go.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३१५१७१९२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु. ग. सोनवणे)
उप सचिव

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
अपर मुख्य सचिव , गृह विभाग
अपर मुख्य सचिव ,महसूल विभाग
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग.
प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग
सचिव, नगर विकास विभाग
सचिव, ग्राम विकास विभाग
मा. मुख्य सचिवांचे सचिव
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हा अधिकारी
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक
मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव ( अ. व सु.) यांच्या स्वीय सहायक
निवडनस्ती (कार्यासन विशेष शाखा-१ (ब) )